**Dept. of Political Science**

***Event/Activity details***

***2020-2021***

| | |
|---|---|
| Event Tile | **Celebration of National Voters' Day-**<br><br>**'Accessible Elections'.** |
| Organized By | Department of Political Science |
| Date of Organization | **25th January 2021** |
| Funding Agency | — |
| Activity for Class | All Students ( B.A. B.Com, B Sc., B Sc. (ECS), B.C.S. |
| Beneficiary number | **44** |
| Coordinator | Prof. Mane J. V |
| Nature : | **Extra-curricular** |
| Collaboration/MOU | **--** |
| Description | **Date : 25th January 2021**<br>Time : 10:00 am to 12:00 pm<br>Venue : **Online**<br><br>On the occasion of **National Voters' Da**y on 25th January 2021, a webinar was organized in the college on the topic of '**Voters Awareness and Easy Elections for Democracy**' in association with the Department of Political Science and Internal Quality Assurance Cell. Presided over by Principal Dr. Madhusudan Bachute. The main **speaker** of this program **Prof. Dr. Mohan Chaugule** (Head, Department of Political Science, Chhatrapati Shivaji Night College of Arts and Science, Solapur). |

Photographs




# सांगोला महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिन साजरा

सांगोला (प्रतिनिधी):– महाविद्यालयात सोमवार दिनांक २५ जानेवारी २०२१ रोजी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त ‘‘लोकशाही साठी मतदाराची जागृती व सुलभ निवडणूक ३९;३९; या विषयावर राज्यशास्त्र विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्यावतीने ऑनलाईन पध्दतीने विदयार्थ्यांचे प्रबोधन आयोजित केले. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा.डॉ.मोहन चौगुले (राज्यशास्त्र विभागप्रमुख, छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर) हे होते.

भारत देश जागाच्या पाठीवर सर्वात मोठी लोकशाही असलेला देश आहे. लोकशाहीमध्ये निवडणूकांना महत्वपूर्ण स्थान आहे. निवडणूकांच्या माध्यमातून सत्ताधारी गटाला अधिमान्यता प्राप्त होत असते. लोकशाहीमध्ये अधिक चांगले प्रतिनिधी निवडले गेले तरच लोककल्याणकारी शासन व्यवस्था अस्वित्वात येवू शकते. त्यामुळे निवडणकांमध्ये मतदारांची भूमिका महत्वपूर्ण ठरते. मतदारांमध्ये निवडणक प्रक्रियांविषयी जागृती होण्याच्या देशभर २५ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा केला जातो.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मधुसूदन बचुटे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून नागरिकांच्या मतदाना विषयी कर्तव्यांचे महत्व सांगितले. नागरिकांनी मतदानाच्या प्रक्रियेत सहभागी होवून अधिक सक्षम लोकप्रतिनिधींची निवड करावी. लोकशाही जिवंत ठेवून अधिक यशस्वी करण्यासाठी मतदानाची टक्केवारी सर्वोच्च असली पाहिजे. या ऑनलाईन व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन प्रा.जे.व्ही.माने ( राज्यशास्त्र विभाग) व अंतर्गत गुणवत्ता हमी सेलचे प्रमुख प्रा.टी.आर.माने यांनी प्राचार्य डॉ.मधुसूदन बचुटे यांच्या मार्गदर्शनाखाली केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन प्रा.जे.व्ही.माने यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रा.डॉ.अमोल पवार यांनी मानले. यावेळी कार्यक्रमास विविध महाविलयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा.डॉ.ए.आर.मासाळ, प्रा.संतोष लोंढे, श्री.पी.एस.शिंदे (अधिक्षक ), श्री.सतिश माने तसेच इतर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.